**<u>अर्जदाराचा उलटतपास : सामनेवाला क. 2 ते 4 तर्फे श्री. बी. एस. शिंदे वकील श्री. ए. बी. चाटे वकील करिता यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

2. हे म्हणणे खरे आहे की, माझे अर्जामध्ये व प्रतिज्ञापत्रामध्ये वडीलांची नेमणूक कोणत्या तारखेस झाली ती तारिख नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, 30/04/2012 रोजी सेवानिवृत्त झाले. माझे वडीलांना एप्रिल 2012 रू. 26,800/– काही तरी पगार होता. हे मला सांगता येणार नाही की, वडीलांच्या पगारामधील बेसिक व डीए किती होता. हे म्हणणे खरे नाही की, मला अर्जाबाबत वडीलांनी दाखल केलेली असल्यामुळे काहीही माहिती नाही. हे मला सांगता येणार नाही की, वडीलांना एप्रिल 2012 मध्ये किती बेसिक मिळत होता व किती डीए मिळत होता. मी वडीलांचे सेवानिवृत्त झाल्याबाबत सर्व्हिस बुक दाखल केलेले आहे. ते सर्व्हिस बुक **<u>आर्टिकल ए–4</u>** वर दाखल केलेले आहे. त्यामध्ये नेमणूकीची तारिख 23/06/1989 नमूद केलेली आहे. आर्टिकल ए–4 साक्षीदारास उलटतपासामध्ये दाखवल्यामुळे त्यास **<u>नि. यु–28</u>** देण्यात येत आहे.

3. माझे वडीलांना **<u>आर्टिकल ए–3</u>** वर रू. 14,695/– बेसिक व डीए रू. 9,552/– आहे त्यास **<u>नि. यु–29</u>** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला यांनी रू. 4,64,360/– एवढी ग्रॅच्युईटीची रक्कम निश्चीत केलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, रू. 4,64,360/– एवढया ग्रॅच्युईटीपैकी रू. 99,475/– सोसायटीची रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम रू. 3,64,885/– मिळालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ग्रॅच्युईटीची रक्कम रू. 4,64,360/– मिळालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जामध्ये व प्रतिज्ञापत्रामध्ये किती रक्कम सामनेवाला यांच्याकडून ग्रॅच्युईटीची येणे बाकी आहे हे नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, रू. 4,64,360/– एवढी रक्कम माझे वडील सेवानिवृत्त झाल्यानंतर लगेच दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सेवानिवृत्त झाल्यानंतर नोव्हेंबर 2017 पर्यंत वडीलांनी ग्रॅच्युईटी मिळाली नसल्याबाबत सामनेवाला यांच्याकडे आक्षेप नोंदवलेला नाही. हे मला सांगता येणार नाही की, माझे वडीलांना दि. 08/11/2017 रोजी दिलेल्या नोटीसमध्ये त्यांना ग्रॅच्युईटी मिळालेली नाही त्याबाबत वाद निर्माण केलेला नाही. हे म्हणणे खरे

आहे की, प्रस्तुतच्या अर्जामध्ये आमच्या वडीलांना कमी ग्रॅच्युईटी मिळाली व इतर कर्मचा–यांना जास्त ग्रॅच्युईटी मिळाली असे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जामध्ये ग्रॅच्युईटीची रक्कम इतर कर्मचा–यांना किती मिळाली हे नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, हे मला माहिती आहे की, ग्रॅच्युईटी ही बेसिक वेतन व डीए वर आधारीत तसेच सेवा कालावधीनुसार दिली जाते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला यांनी माझे वडीलांना ग्रॅच्युईटीची कायद्याप्रमाणे संपुर्ण रक्कम दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला यांनी दुस–या कर्मचा–यांना किती ग्रॅच्युईटी दिली, किती वर्ष काम केले व किती पगार होता हे मला सांगता येणार नाही.

4. हे मला माहिती नाही की, सेवानिवृत्त झाल्यानंतर 30 दिवसाच्या कालावधीमध्ये ग्रॅच्युईटीची रक्कम मागणी बंधनकारक आहे. हे मला सांगता येणार नाही की, प्रस्तुतचा अर्ज 2017 साली दाखल केलेला आहे परंतु, वडील 2012 साली सेवानिवृत्त झाले त्यामुळे मुदतीमध्ये अर्ज दाखल केलेला नाही. हे मला माहिती नाही की, प्रस्तुत प्रकरणामध्ये विलंबाची मागणी अथवा अर्ज दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयातील फाईल व अर्ज पाहिलेला नाही.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.02.09 13:24:29 +0530

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–06/02/2026